पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

# प्रेसनोट क्र. ०३ दिनांक ०४/०१/२०२३

# चोरीच्या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींना अटक करुन वेगवेगळ्या गुन्ह्यांची उकल करण्यात जव्हार पोलीसांना यश.

दि.०३/०८/२०२२ रोजी फिर्यादी नामे श्री. भालचंद्र पांडुरंग पवार, वय ४२ वर्षे, व्यवसाय- नोकरी, (प्रधान तंत्रज्ञ), रा. पोयशेत पो. जामसर, ता. जव्हार जि. पालघर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ईलेक्ट्रीक ट्रान्सफॉर्मर मधील तांब्याचे कॉईल असे वर्णनाचे एकुण १५,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरुन घेऊन गेले म्हणुन जव्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २६०/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वरील प्रकारच्या वाढत्या गुन्ह्यांचे प्रमाण लक्षात घेऊन श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे आदेशान्वये श्री. संजीव पिंपळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, डहाणु विभाग अतिरीक्त चार्ज जव्हार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुधीर संखे, पोलीस निरीक्षक, जव्हार पोलीस ठाणे यांना पथक तयार करुन गुन्ह्याचा तपास करण्याबाबत सुचना दिल्या. नमुद गुन्ह्यात कोणताही पुरावा अथवा धागेदोरे नसताना कौशल्यपुर्ण तांत्रिक तपास करुन तीन संशयीत आरोपींना ताब्यात घेवुन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले.

तसेच आरोपींची अधिक कसून चौकशी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. व कलम |
|---|---|---|
| १. | जव्हार | गुन्हा रजि. नं. I ४०/२०२२ भा. दं. वि. सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| २. | जव्हार | गुन्हा रजि. नं. I १८८/२०२२ भा. दं. वि. सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ३. | जव्हार | गुन्हा रजि. नं. I १९३/२०२२ भा. दं. वि. सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ४. | जव्हार | गुन्हा रजि. नं. I २०१/२०२२ भा. दं. वि. सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ५. | जव्हार | गुन्हा रजि. नं. I २१८/२०२२ भा. दं. वि. सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ६. | जव्हार | गुन्हा रजि. नं. I २७४/२०२२ भा. दं. वि. सं. कलम ३७९ प्रमाणे. |

तीनही आरोपी यांना अटक केली असून त्यांचेकडून वरील वेगवेगळ्या गुन्ह्यांत एकुण ६४,७४०/- रुपये किमतीचा मुद्देमाल व दोन मोटरसायकल हस्तगत करण्यात आल्या आहेत.

सदरची कारवाई ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर व श्री. पंकज शिरसाठ, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, यांचे आदेशान्वये श्री. संजीव पिंपळे, उपविभागीय पोलीस अधिकारी डहाणु विभाग अतिरीक्त चार्ज जव्हार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुधीर संखे, पोलीस निरीक्षक, जव्हार पोलीस ठाणे, पोउपनि/जितेंद्र अहिरराव, पोउपनि/केशव खादे, पोना/७१० भोये, पोना/७५० भोगाडे, पोना/वारंगडे, पोअंम/३६४ काकड, पोअंम/१२२१ बोरसे, सर्व नेमणूक जव्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.